# वैयक्तिक आणि कौटुंबिक समस्यांसाठी आध्यात्मिक समुपदेशन

### नाथानाप्रमाणे समस्यांनी ग्रस्त असलेल्या लोकांना मदत करा.

सध्याच्या गरजा व स्थानिक रिवाजानुसार कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना:** "प्रिय देवा. प्रीतीमध्ये मला सत्य बोलण्यास साहाय्य कर." (इफिस 4:15)


**1. पुढील मार्गदर्शकतत्त्वे वापरून आध्यात्मिक समुपदेशन करण्याची तयारी करा.**

सुधारण्याची आवश्यकता असणाऱ्या एखाद्याला कटू सत्य सांगणे ही तुम्ही त्याच्याकरिता करीत असलेली सर्वात आपुलकीची प्रेमाची गोष्ट होय. नाथानाने दावीदाला देवाशी पुन्हा सहभागिता जोडण्यास कशी मदत केली ते पाहा (2 शमुवेल अध्याय 11-12).

1 ) समजा समस्या वैयक्तिक व्यक्तिगत असेल तर ती खाजगी स्वरूपात हाताळा. अन्यथा एका लहान गटामध्ये ती समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा, म्हणजे इतरांनाही आग्रहाने काही सांगता येईल आणि देवाच्या साहाय्यासाठी प्रार्थना करता येईल.

एक मनुष्य म्हणतो:
**मला वाईट सवय आहे.**
**ती सोडून देण्यास तुम्ही**
**मला मदत कराल का?**

पाळक उत्तर देतात:
**येशू तुला मदत करील.**
**असे माझ्या घरात या.**
**आपण दोघे मिळून बोलू या.**



समजा दुसऱ्या एखाद्या विश्वासणाऱ्याच्या विरुद्ध अपराध केला असेल तर मग दुखावल्या गेलेल्या व्यक्तीने काय करावे ते मत्तय 18:15-16 मध्ये पाहा.

2 ) स्त्रीने पुरुषाला किंवा पुरुषाने स्त्रीला मार्गदर्शन करतांना ते इतर लोकांसमोर करावे अशावेळी एकांतात किंवा बंद खोलीत अजिबात बोलू नका. वाईटाचे दर्शनही आम्ही टाळणे उचित आहे (1 थेस्सल 5:22).

**मला खूप निराश वाटते!**
**कृपा करून मला मदत करा.**

**या आपण बाहेर तिकडे बागेत बसू**
**माझी पत्नीही तिथे आहे.**



3 ) ज्या लोकांचा एखाद्या समस्येशी थेट संबंध आहे. अशांच लोकांशी त्याविषयी बोला. त्या समस्येमुळे दुखावलेली व्यक्ती कुटुंब किंवा विश्वासणारे यांच्याशीच चर्चा करा. एस्तेरने हमानाला त्याच्या कपट कारास्थानाविषयी एकट्याला दोष दिला नाही तर राजासमोर त्याच्या चुकांचे माप त्याच्या पदरात घातले. हामानाने राजालाही फसवले होते. (एस्तेर अध्याय 5-7).

**मी आणि माझे पती फार वाद घालतो ते फार हट्टी आहेत.**

**तर मग आपण उद्या त्यांच्याशी याबाबत बोलू या.**



4 ) लोक आपली समस्या सांगत असताना त्यांचे म्हणणे नीट ऐकून घ्या. समस्येचे मूळ कारण सापडेपर्यंत प्रश्न विचारा. समस्या योग्य प्रकारे समजून घेण्यासाठी आपण काय करणे आवश्यक आहे ते याकोब 1:5 मध्ये पाहा.

**माझे पती मला मुलांना सांभाळण्यासाठी अजिबात मदत करीत नाहीत हीच समस्या आहे.**

**होय बरोबर आहे! प्रश्न असा आहे की तू विनाकारण माझ्यावर रागावतेस. तू त्यांना सर्वसाधारण मुलांप्रमाणे खेळूच देत नाहीस.**



लोकांच्या गुप्त गोष्टी स्वत: जवळच ठेवा. त्याची कुठेही वाच्यता करू नका. तुम्ही खाजगीत ऐकलेल्या गोष्टींचा उच्चार इतर लोकांकडे कधीही करू नका. लावालावी करण्याविषयी देवाचे मत काय आहे ते नीति 11:13 मध्ये पाहा.

**तुम्ही माझ्या चुलत भावाला मार्गदर्शन केले तेव्हा त्याने तुम्हांला काय सांगितले?**

**लोकांनी आम्हांला वि श्वासाने सांगितलेल्या गोष्टींचा असा पुन्हा उच्चार करणे योग्य होणार नाही.**

5 ) समस्येच्या मुळाला देवाचे वचन लागू करा. तुम्ही प्रथम ऐकलेल्या तक्रारी दूर करण्याचा फक्त प्रयत्न करू नका; कारण सर्वसाधारणपणे ही मूळ समस्येची केवळ लक्षणे असतात. चुकीचा वाईट विचार त्यात देवाच्या वचनाच्या आधारे सुधारणा करा. "ख्रिस्ताचे वचन तुम्हांमध्ये भरपूर राहो, परस्परांस सर्व ज्ञानाने शिकवण द्या व बोध करा" कलस्सै 3:16 पाहा 1 तीमथ्य 4:1,2 मध्ये विश्वासहीन माणसे कोणाचा खोटेपणा कवटाळून बसतील.

**माझ्या वाईट सवयी मला सोडता येणार नाही. ती माझ्या अंगात पूरती भिनली आहे.**

**सैतानाने तुला खोटे सांगितले! येशूच्या सामर्थ्यावरील तुझा वि श्वास तू त्याला कमकुवत करू दिलास. तू आता मोठा झाला आहेस आणि कसे वागायचे हे तुला ठरवता येते.**




- समजा एखाद्याने अद्याप विश्वास ठेवला नसेल तर त्याला पश्चात्ताप करून ख्रिस्तामध्ये देवाकडून मिळणारी क्षमा मिळविण्यास साहाय्य करा.

- समजा एखाद्याने विश्वास ठेवला असेल पण तो स्वत:ला अयोग्य अपात्र समजत असेल तर त्याच्या बरोबर इफिस 1 ह्या अध्यायाचा अभ्यास करा आणि तो देवाच्या दृष्टीने कोण आहे तसेच येशूच्या ठायी त्याला सर्वकाळासाठी काय मिळते आहे हे दाखवा यासाठी त्याला देवाचे आभार मानण्यास साहाय्य करा.
- समजा एखाद्याला असुरक्षित वाटत असेल आणि देवाचे आपल्यावर प्रेम नाही असे भय वाटत असेल तर रोम 8 ह्या अध्यायाचा एकत्रित अभ्यास करा.
- समजा एखाद्याला देव खूप दूर आहे किंवा येशू आपल्यावर रागावला आहे असे वाटत असेल तर अशा व्यक्तीला कलस्सै अध्याय 1-3 मधून येशूने त्याच्याकडे देवाचे सामर्थ्य आणि उद्देश्य गोष्टी कशा आणल्या ते दाखवा.

6 ) समस्या सोडविण्यासाठी लोकांनी नेमके काय केले पाहिजे हे ठरविण्यास आणि देवाच्या पवित्र आत्म्याच्या साहाय्याने त्यांची वर्तणूक बदलण्याचे त्यांनी मान्य करावे याकरिता त्यांची मदत करा.

**बरोबर आहे!**
**मी माझ्या पत्नीची क्षमा मागितली पाहिजे आणि मी देखील तिला क्षमा केली पाहिजे तसेच देवाने सांगितले तसे तिच्यावर प्रेम करीन. अगदी बरोबर आहे!**

**देव तुमची समस्या पूर्णपणे सोडवे पर्यंत मी तुमची भेट घेत राहीन.**



7 ) स्वत:मध्ये बदल करण्याची इच्छा असणाऱ्या लोकांनाच मार्गदर्शन समुपदेशन करा. लोकांना त्यांच्या वागणूकीत सुधारणा करायची नसेल किंवा कोणताही बदल केल्याविनाच तुमच्याशी फक्त गप्पाच मारायच्या असतील तर त्यांच्या बरोबरच्या भेटी थांबवा. केवळ लक्ष वेधून घेणे एवढाच उद्देश असणाऱ्या लोकांच्या मागे आपला वेळ व्यर्थ दवडू नका. काही लोकांना बळीचा बकरा होण्यात आनंद वाटतो. काहीजण फक्त स्वत:चाच विचार करतात. येशूने म्हटले, "आपली मोत्ये डुकरांपुढे टाकू नका" (मत्तय 7:6)

2. **आठवड्यातील कार्यक्रमांविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करून योजना आखा:**

वर दिलेल्या मार्गदर्शकतत्त्वांच्या आधारे परिपक्व विश्वासणाऱ्यांना आध्यात्मिक समुपदेशक म्हणून तयार करा: मार्गदर्शनाची आवश्यकता असणाऱ्या लोकांची भेट घ्या.

नाथानाने दावीदाचे समुपदेशन कसे केले ते सांगा 2 शमुवेल अध्याय 11-12.

वर दिलेल्या समुपदेशनाच्या काही मार्गदर्शक तत्त्वांसाठीचा पवित्र शास्त्रातील आधार स्पष्ट करून सांगा.

आध्यात्मिक समुपदेशनाच्याद्वारे नुकत्याच मिळविलेल्या यशाबदल देवाची स्तुती करा किंवा अहवाल द्या.

मुलांनी तयारी केलेली नाटिका कविता व प्रश्न सादर करण्याची संधी द्या.

**पाठ करा 1 करिंथ 14:3**

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी 1 करिंथ 11:28-32 मध्ये दिलेला इशारा थोडक्यात स्पष्ट करून सांगा.

प्रार्थना करणे योजना आखणे आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाच्या देवाणघेवाणीसाठी दोन वा तीन जणांचे गट करा.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net